महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ

शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग,दुसरा मजला,
४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

दुरध्वनी - २६४७ ४४ ३५ www.msbve.gov.in Email : chairman-msbve@nic.in

**जा.क्र. मराव्यशिपमं/का-०४/परीक्षा/प्र.का.जाने-२०२०/२०१९/६५४** **दिनांक :- २६ /०६/२०१९**

प्रति,
जिल्हा व्यवसाय शिक्षण
व प्रशिक्षण अधिकारी, (सर्व)

विषय :- **सहामाही प्रवेश कार्यक्रम प्रवेशसत्र १ जुलै, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९.**
**परीक्षा - जानेवारी २०२०**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे सहामाही सत्र **०१ जुलै २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९** या कालावधीतील सत्राची **परीक्षा जानेवारी २०२०** मध्ये आयोजित करण्यात येईल. सदर परीक्षेसाठी प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची माहिती खालील दिलेल्या नियोजित वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा मंडळाकडे सादर करण्यात यावी. **खाली नमूद केलेला नियोजित प्रवेश कार्यक्रम सर्व संबधित संस्थांना जिल्हा कार्यालयाने लेखी कळविणे आवश्यक आहे.**

| अ.क्र. | नियोजित प्रवेश कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | मंडळाच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे व प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संस्थेने विद्यार्थ्यांकडून **नियमित परीक्षा** (रू. २००/-) व **नोंदणी** (रू. १००/-) शुल्कासह एनरॉलमेंट कम परीक्षा फॉर्म भरून घेणे.<br>संस्थांनी अभ्याक्रमास प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांकडून **नियमित शुल्क** ( नोंदणी फी रू. १००/- व परीक्षा शुल्क रू. २००/- एकत्रित जमा करुन) मंडळाच्या स्टेट बँक ऑफ इंडिया मधील शाखेत चालू खाते क्र. ३१४८५९९९५० मध्ये चलनाव्दारे भरण्यात यावे. | ३१ जुलै २०१९ पर्यंत |
| २ | **अ)** संस्थेने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची एनरॉलमेंट कम परीक्षा अर्जातील माहिती, मंडळाने दिलेल्या सॉफटवेअर मध्ये भरुन सी. डी. (VOCBOARD व MSBVE असे दोन फोल्डर असलेले ) तयार करणे. सदर माहितीच्या आधारे विद्यार्थ्यांना हॉल तिकीट दिले जात असल्याने विद्यार्थ्यांची अचूक माहिती सॉफटवेअरमध्ये भरावी.<br><br>**ब)** संस्थेने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची एनरॉलमेंट/परीक्षा सी.डी. व हार्ड कॉपी तसेच परीक्षा व नोंदणी शुल्क बँकेत भरलेल्या चलनाच्या मूळ प्रती व विद्यार्थ्यांच्या अभिलेखासह जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयात जमा करणे. | ०१/०८/२०१९<br>ते<br>०७/०८/२०१९<br><br>दरम्यान कार्यवाही पूर्ण करणे. |

<table>
<tr>
<td></td>
<td>
विहीत नियमित शुल्क व सॉफटवेअरमध्ये माहिती भरणे
<table>
<tr><th>अक्र</th><th>सॉफटवेअरमधील मेनू</th><th>कोणासाठी वापरावे</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>१</td><td>नविन विद्यार्थी</td><td>मंडळाच्या अभ्यासक्रमासाठी प्रथमच प्रवेश घेणारे विद्यार्थी</td><td rowspan="2">परीक्षा शुल्क रू. २००/- प्रति विद्यार्थी</td></tr>
<tr><td>२</td><td>जुने विद्यार्थी</td><td>ज्यांनी मंडळाचा कोणताही एक अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे.</td></tr>
</table>
</td>
<td></td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>
महत्वाच्या सूचना –<br>
१) संस्थेने नियमित विद्यार्थ्यांच्या माहितीची सीडी तयार करणे. संस्थेने विद्यार्थ्यांचे नाव, फोटो इत्यांदीचा तपशिल अचूक भरणे आवश्यक आहे.<br>
२) संस्थेकडून प्राप्त झालेल्या सीडीमधील माहितीचे संस्थानिहाय फोल्डर तयार करून आपल्या जिल्हयाची एक सीडी तयार करावी. सीडीमध्ये सर्व संस्थांची/विद्यार्थ्यांची माहिती समाविष्ठ झालेली आहे याची खात्री करावी.<br>
३) जिल्हा कार्यालयाने मंडळाने मान्यता/नुतनीकरण दिलेल्या संस्थांकरीता स्वतंत्र रजिस्टर तयार करावे व त्यामध्ये ज्या संस्थांच्या सीडी प्राप्त होतील त्याची दिनांकनिहाय नोंद घ्यावी. ज्या संस्थांची सीडी प्राप्त होणार नाहीत त्यांना लेखी कळविण्यात यावे.
</td>
<td></td>
</tr>
<tr>
<td>३</td>
<td>
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीची व अभिलेखांची तपासणी करणेसाठी शिबिर आयोजित करणे.<br>
संस्थेला अभ्यासक्रम राबविण्याची मान्यता आहे किंवा नाही आणि नुतनीकरण केलेले आहे किंवा नाही याच तपासणी करणे बंधनकारक आहे. मान्यता/नुतनीकरण केल्याची प्रत तपासल्याशिवाय याद्या मंजूर करू नयेत.<br>
मंजूरी याद्यांवर जिव्यशिप्रअ यांची दिनांकीत स्वाक्षरी आवश्यक आहे. मंडळाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, काही संस्था शिबिर आयोजित केल्याच्या दिवशी नोंदणी/परीक्षा शुल्क भरल्याच्या चलनाच्या प्रती सादर करून शिबिर झाल्यावर विद्यार्थ्यांच्या याद्या मंजूरीस सादर करीत आहेत. सदर बाब चूकीची असून शिबिराच्या दिवशीच विद्यार्थ्यांची यादी मंजूर करून घेणे व चलनाच्या प्रती सादर करणे आवश्यक आहे.<br>
जिल्हा कार्यालयाने आवश्यक त्या बाबींची पुर्तता झाल्याची खात्री केल्याशिवाय प्रवेश याद्या मंजूर करू नयेत.<br>
अ) प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अर्हतेच्या अभिलेखची पडताळणी करून विद्यार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास पात्र आहेत किंवा नाहीत याची तपासणी करणे.<br>
ब) संस्थेने सादर केलेल्या सीडीमध्ये जिल्हा कार्यालयाचा युजरनेम व पासवर्ड वापरून किंवा सर्व संस्थांच्या सीडी एकत्रित करून त्यामधे असणारी विद्यार्थ्यांच्या माहिती व संस्थेने जमा केलल्या विद्यार्थ्यांच्या यादीची तपासणी करणे.<br>
क) शासकीय तांत्रिक विद्यालयातील कर्मचाऱ्यांची शिबिराप्रसंगी तपासणी करण्यासाठी मदत घ्यावी व तसे आदेश जिल्हा कार्यालय स्तरावरून देण्यात यावेत.<br>
ड) जिल्हा कार्यालयाने पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या मंजूरीची एक प्रत संबधित संस्थेस देण्यात यावी व दुसरी प्रत मंडळास पाठविण्यात यावी.
</td>
<td>०१/०८/२०१९<br><br>ते<br><br>०७/०८/२०१९<br><br>दरम्यान कार्यवाही पूर्ण करणे.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ४ | <u>उशिराने प्राप्त झालेल्या अर्जाचे प्रती विद्यार्थी विलंब शुल्क स्विकारणे</u> :-<br>**अ) विलंब शुल्क** :- नोंदणी शुल्क रू. १०० + परीक्षा शुल्क रू. २०० +<br>Late Fee @ rate of २५ % of Examination Fees<br>(रू. १०० + रू. २००+ रू. ५० = ३५०/-)<br>(दि. १०/०८/२०१९ रोजी कार्यालयीन वेळेत जिल्हा कार्यालयात सीडी/ चलन/ अभिलेख जमा करणे)<br>**ब) अतिविलंब शुल्क** :- नोंदणी शुल्क रू. १०० + परीक्षा शुल्क रू. २०० +<br>Late Fee @ rate of १०० % of Examination Fees<br>(रू. १०० + रू. २००+ रू. २००/- = ५००/-)<br>(दि. २०/०८/२०१९ रोजी कार्यालयीन वेळेत जिल्हा कार्यालयात सीडी/ चलन / अभिलेख जमा करणे)<br>**दि. २०/०८/२०१९ नंतर आलेली कोणत्याही विद्यार्थ्यांची सीडी जिल्हा कार्यालयाने स्विकारू नये. सदर सीडीबाबत कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही व याची जबाबदारी मंडळ कार्यालयाची राहणार नाही.** | ०१/०८/ २०१९ ते १०/०८/२०१९ पर्यंत<br><br>११/०८/२०१९ ते २०/०८/२०१९ पर्यंत |
| ५ | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी मंजूर केलेल्या याद्यांनुसार सर्व संस्थांची नियमित शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांची एनरॉलमेंट सी.डी. आणि खालील बाबी मंडळ कार्यालयाकडे सादर करणे.<br>१. वरील सीडी व त्यातील माहितीची हार्ड प्रत.<br>२. संस्थेने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची जिल्हा कार्यालयाने प्रमाणित केलेली विद्यार्थ्यांची (**मंडळाच्या सॉफ्टवेअरमध्ये तयार केलेली**) मंजूरी यादी.<br>३. नोंदणी/परीक्षा शुल्क स्टेट बँकेत भरलेल्या चलनाची मूळ प्रत व तपासणीबाबतचे प्रमाणपत्र.<br>४. परीक्षा केंद्र यादी<br>५. स्टेशनरी यादी<br>६. सदर प्रवेश कार्यक्रम संस्थांना कळविल्याचे पत्र | ३१/०८/२०१९ पर्यंत |
| ६ | १. स्वतंत्र पत्राव्दारे प्रश्नपत्रिका मागणीपत्र तयार करून **msbve2012mp@gmail.com** हयावर ईमेलव्दारे सादर करण्यात यावे. <u>सॉफ्टवेअरमध्ये तयार झालेली प्रत सादर करू नये.</u><br>२. <u>**प्रश्नपत्रिका मागणीपत्र पोस्टाने सादर करू नये. केवळ वरील ईमेलवर प्राप्त् झालेली प्रश्नपत्रिका मागणीपत्र ग्राहय धरण्यात येतील याची नोंद घ्यावी.**</u> | २५/०८/२०१९ पर्यंत |

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी व संबधित संस्था यांनी प्रवेशाबाबतच्या खालील दिलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे.

* नोंदणी व परीक्षा शुल्क भरावयाच्या चलनावर संस्थांनी त्यांच्या संस्थेचे नाव, संस्था क्र. अभ्यासक्रमाचे नाव व नोंदणी/परीक्षा शुल्क इत्यादीचे उल्लेख करणे आवश्यक आहे. नसल्यास चलन स्विकारण्यांत येऊ नये.

* या कार्यालयाचे पत्र क्र.मराव्यशिपमं/का-१२/१००१/२०१५, दि. ०३/०६/२०१५ नुसार ६ महिने पूर्णवेळ स्वरूपाच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडून मूळ लिव्हिंग सर्टिफिकेट (LC), मूळ गुणपत्रिका (Marksheet) घेण्यात यावी. मूळ लिव्हिंग सर्टिफिकेट (LC) मूळ गुणपत्रिका (Marksheet)

**उपलब्ध नसल्यास या कार्यालयाचे पत्र क्र.मराव्यशिपमं/का-१/१८१०/२०१५,दि. १८/०९/२०१५ नुसार उमेदवाराकडून प्रमाणपत्रांच्या डुप्लीकेट (द्वितीय प्रत) प्रती सोबत अंडरटेकींग घेण्यात यांवे, सदर लिव्हिंग सर्टिफिकेट व गुणपत्रिका पडताळणीसाठी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाकडे प्रवेशाचे यादीसह वरील कार्यक्रमानुसार सादर करावे.**

* जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी पूर्णवेळ अभ्यासक्रमासाठी मूळ किंवा डुप्लीकेट लिव्हिंग सर्टिफिकेट व मूळ मार्कशीट घेऊन प्रवेश दिलेले आहेत याची पडताळणी करून तसे प्रमाणित करणे. सदर अभिलेख नसल्यास प्रवेशासमान्यता देऊ नये.
* संबधित संस्थांनी मूळ लिव्हिंग सर्टिफिकेट व मूळ मार्कशीट विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर त्यांना परत करावे. तोपर्यत संस्थांनी त्याचे अभिलेख सुस्थितीत जतन करावे.
* अर्धवेळ स्वरूपाच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी मूळ लिव्हिंग सर्टिफिकेट व मूळ मार्कशीट यांची आवश्यकता राहणार नाही.
* मंडळाच्या कुठल्याही अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ATKT लागू राहणार नाही.

०१) मंडळाचे पूर्णवेळ/अर्धवेळ अभ्यासक्रमास प्रवेश देताना संबधित विद्यार्थ्याचे शैक्षणिक अर्हतेच्या अभिलेखाची पडताळणी करणे आवश्यक आहे.

०२) मंडळाचे अभ्यासक्रमास विद्यार्थी एकापेक्षा जास्त अर्धवेळ अभ्यासक्रमांस प्रवेश घेवू शकतो. परंतु सदर अभ्यासक्रमांची परीक्षा एकाच दिवशी आल्यास वेळापत्रकात कोणतेही बदल करण्यात येणार नाही. त्याबाबतची जबाबदारी मंडळाची राहणार नाही.

०३) संस्थेकडून विद्यार्थ्यासंबधी जी माहिती परीक्षा मंडळाकडे सादर केली जाईल, त्यामध्ये परीक्षा मंडळस्तरावर कोणताही बदल केला जाणार नाही. त्यामुळे सादर केलेली माहिती चुकीची असल्यास त्याबाबतची जबाबदारी संस्थेची राहील.

०४) परीक्षा मंडळाचे अभ्यासक्रमास प्रवेश निश्चित करताना शैक्षणिक पात्रता तपासणीची जबाबदारी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांची राहील.

०५) मंडळाचे 'मोटार ड्रायव्हिंग' या अभ्यासक्रमासाठी वय १८ वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही अभ्यासक्रमास वयाची अट लागू राहणार नाही.

०६) विद्यार्थ्यानी ज्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे. त्याच अभ्यासक्रमाची परीक्षा घेण्यात येईल.

०७) संस्थेच्या सर्व अडचणी व शंकाचे निरसन प्रथम जिल्हा कार्यालय स्तरावर करण्यात यावे.

०८) एनरॉलमेंट अथवा परीक्षा सॉफटवेअर सी. डी. मध्ये विद्यार्थ्याची माहिती भरताना विद्यार्थ्याचा कलर फोटो व स्वाक्षरी टाकणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे नाव व फोटो यांची माहिती अचूक भरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची अचूक माहिती भरल्याबाबत संस्थाप्रमुखांकडून प्रमाणित करून घ्यावे.

०९) परीक्षा मंडळास विद्यार्थ्यांकडून वेगवेगळया कारणांसाठी घेण्यात येणारे शुल्क उदा. नोंदणी शुल्क, परीक्षा शुल्क, गुणपत्रक पडताळणी शुल्क, दुय्यम प्रमाणपत्र शुल्क, विलंब शुल्क व दंड शुल्क इ. सचिव महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, वांद्रे (पू), मुंबई ५१ यांच्या नावे असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत चालू खाते क्रमांक ३१४८५९९९९५० यामध्ये चलनाव्दारे जमा करण्यात यावेत. (उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण - २०१०(२४६/१०) व्यशि-२(अर्थसं) दि.२२/१०/२०१०नुसार)

१०) वरील नियोजित कार्यक्रमामधील अक्र ०४ मधील (अ) आणि (ब) यामध्ये नमूद केल्याप्रमाणे विलंब व अतिविलंब शुल्क स्विकारावे. दि.२०/०८/२०१९ नंतर कोणत्याही संस्थेची सीडी स्विकारू नये. सदर प्रकरणी अनियमितता झाल्यास त्यास जिल्हा कार्यालय सर्वस्वी जबाबदार राहील.

११) मंडळाने संस्थांना ज्या अभ्यासक्रमांना मान्यता दिलेली आहे तसेच चालू वर्षात ज्या अभ्यासक्रमासाठी नुतनीकरण केलेले आहे केवळ अशाच अभ्यासक्रमांना संस्थेने विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याची पडताळणी करावी. ज्या अभ्यासक्रमांना मंडळाकडून मान्यता घेण्यात आलेली नाही किंवा नुतनीकरण करण्यात आलेले नाही अशा अभ्यासक्रमांचे प्रवेश अनधिकृत ठरविण्यात यावे.

१२) संस्थेने विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमास प्रवेश देण्यापूर्वी त्यांच्या आवश्यक त्या पात्रतेविषयी तपशिल प्राप्त करून घ्यावयाचे आहे. तसेच कोणत्याही परिस्थितीत अपात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये. अशा विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही व त्याबाबतची जबाबदारी संबधित संस्थेची राहील.

मंडळाने ज्या अभ्यासक्रमांना मान्यता दिलेली नाही अथवा नुतनीकरण करण्यात आलेले नाही अशा संस्थांनी मंडळाच्या अभ्यासक्रमांस विद्यार्थी प्रवेश केल्यास असे प्रवेश अनधिकृत समजले जातील. या संदर्भात शासनाचे दिनांक २१ ऑगस्ट २०१३ च्या अधिसूचनेनुसार अशा अनधिकृत प्रवेशास प्रतिबंध केलेला आहे. असे अनधिकृत प्रवेश केल्याचे आढळल्यास संस्था दंडात्मक कारवाईस पात्र राहील.

१३) या पत्रान्वये सादर करण्यात आलेल्या नियोजित प्रवेश कार्यक्रमापूर्वी म्हणजेच पूर्वी एखाद्या संस्थेला अभ्यासक्रम राबविण्याची कोणत्याही कारणास्तव मंडळाकडून मान्यता प्राप्त झाली नाही वा नुतनीकरणाची कार्यवाही पूर्ण झाली नाही तर अशा संस्थांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात येऊ नये. अशा प्रकारे प्रवेशित विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होण्यास अपात्र असतील व त्याबाबतची सर्व जबाबदारी संबधित संस्थेची राहील.

१४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. व्हीओसी२०१२/५९१/प्रक्र/२४५(क) व्यशि-४, मंत्रालय, मुंबई, दि.२८/०९/२०१२ मधील नमूद केलेल्या अटीनुसार :- संस्थेत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांचे प्रवेशित विद्यार्थ्यांचे ६ महिने कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी किमान १२० दिवस प्रशिक्षण होणे आवश्यक आहे.

१५) जिल्हा कार्यालयाने वरील नियोजित प्रवेश कार्यक्रम त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना लेखी कळवावे व त्याची एक प्रत मंडळ कार्यालयास सादर करण्यात यावी.

**टिप — सदर सत्रापासून विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करावयाची निर्णय झाल्यास वरील कार्यक्रमात बदल करण्यात येईल. तसेच त्याबाबत सुधारीत सूचना निर्गमित करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.**

आपला,

(एस. के. वायदंडे)
सचिव
म.रा. व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

प्रत :- १) मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सादर.
२) परीक्षा यांना माहिती व कार्यवाहीसाठी .
३) संगणक विभाग - सदर पत्र वेबसाईटवर टाकणेसाठी.